**उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, डॉ.पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना व इतर शिक्षण शिष्यवृत्ती योजना महाडीबीटी पोर्टलमधून काढण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१७/प्र.क्र.४६५/तांशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.
दिनांक: १४ फेब्रुवारी, २०१८

**संदर्भ**: १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक टीईएम-२०१६/ प्र.क्र.५५९/ तांशि-४, दिनांक १५.४.२०१७.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१७/ प्र.क्र.३३२/ तांशि-४, दिनांक ७.१०.२०१७.
३) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक इबीसी-२०१७/प्र.क्र.५२४/शिक्षण-१, दिनांक ८.१२.२०१७.

**प्रस्तावना**:-

विविध विभागांच्या केंद्र व राज्य शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्क / परीक्षा शुल्क योजनांतर्गत लाभाची रक्कम पात्र विदयार्थ्यांना देण्यासाठी सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने विकसित केले आहे. सदर महाडीबीटी पोर्टलवर काही विदयार्थ्यांना अर्जाची नोंद करण्यास अडचणी येत आहेत. त्याचबरोबर महाविदयालयांकडून विदयार्थ्यांचे परिपूर्ण अर्ज शासकीय कार्यालयांकडे पाठविण्यास अडचणी येत असल्याने आणि सन २०१७-१८ च्या पहिल्या सत्रासाठी सदरहू पोटलचे पूर्णत: कार्यन्वयन होणे बाकी आहे त्यामुळे विविध विभागांनी संदर्भिय शासन निर्णयान्वये विहित केलेल्या शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क इत्यादि योजनांच्या प्रदानांची रक्कम डिबीटी पोर्टलव्दारे विदयार्थ्यांना उपलब्ध करण्यास काही अवधी लागणार असल्याची बाब निदर्शनास आली आहे. त्यानुसार विविध विभागांच्या केंद्र व राज्य शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती / फ्रीशिप योजना सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता महाडीबीटी पोर्टल मधून वगळण्याबाबतचा निर्णय मंत्रिमंडळाच्या दिनांक २१/११/२०१७ रोजी घेतलेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. सदर प्रस्ताव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सादर करण्यात आला होता. मंत्रिमंडळाच्या कार्यवृत्तामध्ये नमूद केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता महाडीबीटी प्रणालीतून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शालेय शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग व अल्पसंख्यांक विकास विभाग यांच्या योजना महाडीबीटी प्रणालीतून वगळण्यात व त्याची

अंमलबजावणी ऑफ-लाईन पध्दतीने करुन आधार संलग्नीत बँक खात्यात लाभ अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याच धर्तीवर उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना आणि उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील विविध शिष्यवृत्ती योजना देखील शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता महाडीबीटी प्रणालीतून वगळून त्याची अंमलबजावणी पूर्वीच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे परंतु संबंधीत योजनेच्या लाभाची रक्कम लाभार्थी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट जमा करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**:-

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील विविध मान्यताप्राप्त व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिकणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विदयार्थ्यांकरीता असलेल्या तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना आणि उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व विविध शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता महाडीबीटी प्रणालीतून वगळून त्याची अंमलबजावणी पूर्वीच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे परंतु संबंधीत योजनेच्या लाभाची रक्कम लाभार्थी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट जमा करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. हया शिक्षण शिष्यवृत्ती / निर्वाह भत्ता योजना पूर्वीप्रमाणेच तंत्र शिक्षण संचालनालयाने व उच्च शिक्षण संचालनालयाने विहित केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे राबविण्यात येतील. तथापि लाभाची रक्कम विदयार्थ्यांच्या आधार संलग्नीत बँक खात्यात थेट जमा करण्यात येईल. त्याकरिता महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम,२०१६ च्या कलम ३ मधील तरतूद याकरीता विचारात घेण्यात येईल.

३. विशेष चौकशी पथकाने कारवाईसाठी शिफारस केलेल्या दोषी संस्था व अनुज्ञेय नसलेले अभ्यासक्रम वगळण्यात येतील.

४. सदर प्रयोजनासाठी महाडीबीटी पोर्टलवर विदयार्थ्यांनी भरलेला डेटा (अपलोडेड फाईल्स वगळून) माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडून उपलब्ध करुन घेण्यात येईल.

५. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता आधार संलग्नित बायोमेट्रीकक उपस्थितीच्या अहवालाऐवजी संस्थांकडे असलेली उपस्थितीची माहिती / पुरावा ग्राहय धरण्यात येईल.

६. तंत्र शिक्षा संचालनालयाकडून या प्रयोजनासाठी पूर्वीची यंत्रणा /एजन्सी यांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्यात येतील.

७. माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडून विदयार्थ्यांच्या आधार क्रमांकाची सत्यता (ऑथेंटिकेशन) पडताळण्यासाठी माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचे आवश्यक ते सहकार्य घेण्यात येईल.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०२१४१३१८१६३५०८ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Madan Maruti Morve

Digitally signed by Madan Maruti Morve
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2efbf911362ce57b361b7f36471cb98eb98ed47e7de8b061211b9d7e6e0fc2e3, cn=Madan Maruti Morve
Date: 2018.02.14 13:24:13 +05'30'

**( म.मा.मोरवे )**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी
५. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव (कृषी), कृषी व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, (माहिती तंत्रज्ञान),सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
११. सचिव (प.दु.म), कृषी व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
१५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
१६. संचालक, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१७. सर्व सन्मानीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
१८. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१९. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक

२०. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२१. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२२. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२३. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२४. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२५. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२६. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
२७. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२८. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२९. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
३०. कुलगुरु, सर्व विद्यापीठे
३१. कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.मागणगांव, जि.रायगड
३२. कुलगुरु,महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
३३. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
३४. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
३५. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
३६. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
३७. सर्व जिल्हाधिकारी
३८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
३९. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
४०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४१. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
४२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
४३. सर्व संबंधित मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
४४. उप सचिव (मशि/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४५. अवर सचिव (तांशि-३, विशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४६. कक्ष अधिकारी(मशि-२/मशि-४/तांशि-५/तांशि-६/साशि-१),उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
४७. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
४८. निवडनस्ती/तांशि-४

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in


जा.क्र.तंशिविकापु/विवि/ईबीसी २०१७-१८/२०१८/720 दिनांक :- 15/2/2018.

प्रति,

प्राचार्य/संचालक,
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्था

विषय :- उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना महाडीबीटी पोर्टलमधून काढण्याबाबत....

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१६प्र.क्र ५५९/ताशि-४ दिनांक २१/०६/२०१७.

२) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७ प्र.क्र.३३२/तांशि-४ दिनांक ७/१०/२०१७

३) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७ प्र.क्र४६५/तांशि-४ दिनांक १४/०२/२०१८

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -२०१७/प्र.क्र ४६५/ताशि-४ दिनांक १४/०२/२०१८ नुसार शासनाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील विविध मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिकणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्याकरीता असलेल्या तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता महाडीबीटी प्रणालीतून वगळून त्याची अंमलबजावणी पूर्वीच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे परंतु संबधीत योजनेच्या लाभाची रक्कम लाभार्थी विद्यार्थ्याच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट जमा करण्यास शासनाची मान्यता दिली आहे.

या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्थाना सुचित करण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आला असून, त्याचे अवलोकन करावे. त्याचप्रमाणे, या अनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालयाकडून प्राप्त होणा-या सुचना आपणास कळविण्यात येतील त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय क्रमाक १ व २ मध्ये नमुद केलेल्या पात्रतेच्या अटी व शर्तीनुसार पात्र विद्यार्थ्यापैकी एकही पात्र लाभार्थी विद्यार्थी योजनाच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता सर्व संस्था प्रमुखांनी घ्यावी.

Gaikwad 15.2.18

f प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे